# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com


वाचा: 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 10 मार्च 2021.
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 15 मार्च 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 25 /03/2021.

**विषय:- कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून होळी/धुलीवंदन/रंगपंचमी सण/उत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्यास मनाई करणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस कोविड-19 च्या रुग्णसंख्येत वाढ होताना दिसत असून कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये संदर्भ क्र. 4 च्या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या निर्बंधान्वये तसेच संदर्भ क्र. 5 च्या महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार सर्व सामाजिक/राजकीय/क्रीडा/मनोरंजन/शैक्षणिक/सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रम व इतर सभा संमेलने यांना मनाई करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी होळी/धुलीवंदन/रंगपंचमी या सण/उत्सवामध्ये सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, रिसॉर्ट, सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक व खाजगी मोकळ्या जागा, सर्व गृह निर्माण संस्थांमधील मोकळ्या जागा येथे लहान मुले, युवक, प्रौढ नागरिक मोठ्या संख्येने एकत्रित येऊन सण/उत्सव साजरा करित असल्याने गर्दी टाळण्यासाठी व कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यात दि. 28.03.2021 रोजी साजरा होणारा होळी सण/उत्सव व दिनांक 29.03.2021 रोजी साजरा होणारा धुलीवंदन तसेच दि. 02.04.2021 रोजीचा रंगपंचमी सण/उत्सव साजरे करण्यास मनाई करणे अगत्याचे झाले आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2, 3 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार **उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून गर्दी टाळण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, रिसॉर्ट, सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक व खाजगी मोकळ्या जागा, सर्व गृह निर्माण संस्थांमधील मोकळ्या जागा येथे दि. 28.03.2021 रोजी साजरा होणारा होळी सण/उत्सव व दिनांक 29.03.2021 रोजी साजरा होणारा धुलीवंदन तसेच दि. 02.04.2021 रोजीचा रंगपंचमी सण/उत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्यास मनाई करित आहे.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, साथरोग अधिनियम 1897 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि. 25/03/2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आला आहे.

**(कौस्तुभ दिवेगावकर)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
10. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner